**क्रमांक १२**

# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४/ फाल्गुन ७, १९४५ शके

१२. सर्व सन्माननीय सदस्यांना याद्वारे कळविण्यात येते की, "लोअर परळ विभागातील भूकर क्र. १/४४५, शंकरराव नराम पथ येथील बांधकामाच्या अभिन्यासास मंजुरी देताना बृहन्मुंबई महानगरपालिकेने निर्धारित केलेल्या अटी व शर्तींचे उल्लंघन करण्यात आल्याप्रकरणी लेखी स्वरूपातील अहवाल उपलब्ध करून देण्याबाबत" सन्माननीय विधान परिषद सदस्य श्री. सुनिल शिंदे यांनी दिनांक २५ जानेवारी, २०२३ रोजी उप मुख्य अभियंता (शहर), इमारत प्रस्ताव विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, वडाळा, मुंबई यांचेकडे लेखी निवेदन दिल्यानंतर सुमारे तीन महिन्यांचा कालावधी होऊन देखील उप मुख्य अभियंता (शहर), इमारत प्रस्ताव विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडून माहिती उपलब्ध न झाल्याने सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री.सुनिल शिंदे यांनी उप मुख्य अभियंता (शहर), इमारत प्रस्ताव विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याविरुध्द दिनांक २ मे, २०२३ रोजी दिलेली विशेषाधिकार भंग व अवमानाची सूचना मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी महाराष्ट्र विधान परिषद नियम २५१ मधील तरतूदींच्या अधीनतेने विधानपरिषद विशेषाधिकार समितीकडे तपासणीसाठी व अहवाल सादर करण्यासाठी दिनांक २९ नोव्हेंबर, २०२३ रोजी सुपूर्द केली आहे.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : २६ फेब्रुवारी, २०२४**

**(जितेंद्र भोळे)**
**सचिव (१) (कार्यभार)**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

**प्रती :-**

**(१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य**
**(२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी**
**(३) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी**
**(४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी**
**(५) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
**(६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालय**
**(७) संगणक कक्ष (WEBSITE)**